RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ८, अंक ३]		गुरुवार, जानेवारी २०, २०२२/पौष ३०, शके १९४३		[पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**" भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ " चे कलम २५ खाली अधिसूचना**
**जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांजकडून**

क्र.उपजिभू क्र. ७/भूसं/मुंउजि/एलएक्यू ८४२-ए/२०२१.—मौजे विक्रोळी तालुका कुर्ला, जिल्हा मुंबई उपनगर येथील " भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ " अंतर्गत न.भू.क्र.५१ अ, १अ चे भूसंपादन.

ज्याअर्थी, प्रस्तुत भूसंपादन प्रकरणी नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लि. भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाला असून प्रकरणी भूसंपादनाची कार्यवाही करणेकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक १० जून २०१९ रोजीचे आदेशान्वये उपजिल्हाधिकारी ( भूसंपादन ) क्र. ७ यांना प्राधिकृत केले आहे. प्रकरणी कलम ११ ची अधिसूचना दिनांक २५ ऑक्टोबर २०१९ रोजी व कलम १९ ( १ ) ची अधिसूचना दिनांक २१ जानेवारी २०२० रोजी प्रसिद्ध झाली ;

ज्याअर्थी, विहीत मुदतीत निवाडा घोषित करणे शक्य नसल्याची जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांची खात्री झाल्याने व भूमी संपादन अधिनियम, २०१३ चे कलम २५ अन्वये दिनांक १८ जानेवारी २०२१ रोजी **महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करणेत येऊन निवाडा घोषित करण्याच्या कालावधीत १२ महिन्यांची वाढ यापूर्वी मंजूर करण्यात आली आहे ;

ज्याअर्थी, प्रारुप निवाडा मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांसकडे मंजुरीसाठी सादर केला असता त्यांनी दिलेल्या निर्देशाची पूर्तता करणेकामी नगर विकास विभागाकडे प्रलंबित असलेल्या बाबीस विहीत मुदतीत मंजुरी प्राप्त होऊन आवश्यक ती कार्यवाही करणेकामी कलम १९ ( १ ) च्या अधिसूचनेच्या अनुषंगाने विहीत मुदत लक्षात घेता सद्यस्थितीत सदर निवाडा जाहीर करणेस वाढीव मुदत न दिल्यामुळे जर हा निवाडा रद्द झाला तर सदर प्रकरणात पुन्हा कलम ११ व १९ ची अधिसूचना प्रसिध्दी, संयुक्त मोजणी, प्रारुप निवाडा, अंतिम निवाडा ही कार्यवाही करण्यासाठी वेळ जाऊन शासनाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही ;

आणि ज्याअर्थी, कलम १९ च्या अधिसूचनेच्या अनुषंगाने उपरोक्त कलम २५ च्या अधिसूचनेद्वारे वाढीव १२ महिन्यांच्या कालावधीत निवाडा घोषित करणेस झालेल्या विलंबास समर्थन करणारी परिस्थिती असून सदर मुदतीत निवाडा घोषित करणे शक्य नसल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम -२५ अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, या नात्याने प्रकरणात १२ महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा असलेला अधिकार वापरुन खालील प्रकरणातील अंतिम निवाडा पारित करण्यास दिनांक १७ जानेवारी २०२२ पासून १२ (बारा) महिन्यांची वाढीव मुदत मंजूर करत आहे.

**अनुसुची-एक जमिनीचे वर्णन**

मौजे विक्रोळी, तालुका कुर्ला, जिल्हा मुंबई उपनगर

| अ.क्र. | न.भू.क्र. | आवश्यक जमिनीचे क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| १. | ५१ अ | १५१४९.६० |
| २. | १अ | २४१०२.४० |
| | **एकूण** | **३९२५२.००** |

**सार्वजनिक प्रयोजन.**—" मुंबई अहमदाबाद हाय स्पीड रेल्वे प्रकल्प " करीता भूसंपादन.

मुंबई,

दिनांक १९ जानेवारी २०२२.

**निधी चौधरी,**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.